**ठळक बातम्या**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विधानावरुन आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ/ कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब
- महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांनी पदभार स्वीकारला
- वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार रवींद्र वायकर यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली
- **आणि**
- जम्मू - काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबतच्या चकमकीत पाच दहशतवादी ठार

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरुन आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ झाला. घोषणाबाजीमुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेत कामकाज सुरु झाल्यावर काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पार्टी, आणि इतर पक्षांचे सदस्य अमित शाह यांच्या विरोधात घोषणा देऊ लागले. काही सदस्य सभापतींसमोरच्या

मोकळ्या जागेत शिरले. घोषणा चालूच राहिल्याने सभापती ओम बिरला यांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

राज्यसभेत या आणि इतर विषयावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात काँग्रेस, द्रमुक, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, राजद, आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. गोंधळ वाढतच गेल्यामुळे अध्यक्षांनी दुपारी २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या समर्थनार्थ तसंच काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप खासदारांनी आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली. भाजपच्या सदस्यांनी हातात फलक घेत घोषणाबाजी केली. नेहरु- गांधी परिवाराने नेहमीच आंबेडकरांचा अपमान केल्याचा आरोप माजी केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी बातमीदारांशी बोलताना केला.

दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यां बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेल्या वक्तव्याबाबत विरोधी पक्षांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. शाह यांनी माफी मागावी अशी मागणी करत काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, डावे पक्ष आणि इतर पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात मोर्चा काढला केली. भाजपाचे खासदार स्वतःला वाचवण्यासाठी आंदोलन करत असल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के.सी.वेणुगोपाल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना यांनी केला.

या निदर्शनांमधे धक्काबुक्की होऊन भाजपाचे प्रताप सरंगी जखमी झाले.त्यांना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आलं. आपल्याला राहुल गांधी यांचा धक्का लागल्याचा आरोप सरंगी यांनी केला आहे. संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. या धक्का बुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. झाल्या प्रकाराची सविस्तर चौकशी करण्याची मागणी त्यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडे केली.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक संदर्भातल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी ३१ सदस्यांची संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत लोकसभेतले २१ आणि राज्यसभेतले दहा खासदार आहेत. भाजप नेते पी पी चौधरी, अनुराग सिंग ठाकूर, पुरुषोत्तम रुपाला यांच्यासह काँग्रेस नेते प्रियांका गांधी, मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांचा या समितीमध्ये समावेश आहे.

**<><><><><>**

भारतातल्या वैद्यकीय उपकरण निर्मिती क्षेत्रामध्ये विस्ताराची अफाट  क्षमता आहे असं प्रतिपादन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं त्या वार्षिक आरोग्य परिषदेला संबोधित करत होत्या. भारतात वैद्यकिय उपकरणांचा व्यवसाय अंदाजे चौदा दशलक्ष डॉलर्स

मूल्याचा आहे आणि तो वर्ष २०३० पर्यंत ३० दशलक्ष डॉलर्सपर्यंत जाईल असं त्यांनी सांगितलं. वैद्यकीय उपकरणांच्या क्षेत्राच्या आशियाई बाजारपेठेत भारत चौथ्या स्थानावर आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

देशाची लोकसंख्या जमेची बाजू असून तिचा उपयोग करण्यासाठी, नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यातून शाश्वत प्रगती साधण्यासाठी आरोग्य सेवा आणि शिक्षण प्रणालीमध्ये गुंतवणूक करणं आवश्यक असल्याचं केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे वार्षिक आरोग्य शिखर परिषदेला संबोधित करताना त्या बोलत होत्या. आरोग्य सेवेत खासगी क्षेत्रंही महत्त्वाची भूमिका बजावत असून उद्योगपतींनी क्षयरोग मुक्त भारत या उद्दिष्टासाठी योगदान द्यावं असं आवाहनही श्रीवास्तव यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची निवड झाल्याचं उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आज जाहीर केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिंदे यांना सभापतींच्या खुर्चीवर आसनस्थ केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभापती पदावर सभागृहाने एकमताने निवड केल्या बद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले .

**<><><><><>**

गेल्या लोकसभा निवडणुकीत वायव्य मुंबई मतदारसंघातले शिवसेना नेते रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने आज फेटाळली. वायकर यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल किर्तीकर यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी ती फेटाळली आहे. मतमोजणीच्या वेळी तथाकथित वादग्रस्त मतं वायकर यांना कशी मिळाली, हे सिद्ध करण्यात कीर्तीकर अपयशी ठरले असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनं व्याजदरात पाव टक्के कपात करण्याचा निर्णय काल रात्री घेतला आहे. प्रमुख व्याजदर सव्वाचार ते साडेचार टक्क्यांच्या दरम्यान ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचं फेडरल रिझर्व्हने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या निर्णयामुळे अमेरिकेच्या शेअर बाजाराच्या तिन्ही प्रमुख निर्देशांकात घट झाली आहे.

या निर्णयाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झालेला दिसून येत आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स निर्देशांकात आज सुमारे आठशेहून अधिक अंकांची घसरण दिसून आली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २००हून अधिक अंकांनी घसरला आहे. ही घसरण दुपारच्या सत्रापर्यंत कायम आहे.

<><><><><>

मध्ये प्रदेशमध्ये ग्वाल्हेर इथे आयोजित जगप्रसिद्ध तानसेन महोत्सवात काल राष्ट्रीय तानसेन पुरस्कार आणि राजा मानसिंग तोमर पुरस्कार प्रदान करण्यात आले. भारतीय शास्त्रीय संगीतातले प्रसिद्ध तबलावादक पंडित

स्वपन चौधरी यांना सन २०२३साठी राष्ट्रीय तानसेन सन्मान प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये रोख, सन्मान चिन्ह आणि शाल-श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. तर इंदूर इथल्या सानंद न्यास या संस्थेला सन २०२३साठी राजा मानसिंग तोमर सन्मान प्रदान करण्यात आला. ही संस्था गेली ३५ वर्षं इंदूरमध्ये शास्त्रीय संगीत क्षेत्रात कार्यरत आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यासाठी मध्य रेल्वे चौतीस विशेष गाड्या सोडणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर तसंच इतर ठिकाणांहून या विशेष गाड्या सुटतील. या गाड्यांमध्ये 20 डिसेंबरपासून प्रवासी आरक्षण प्रणाली तसंच www.irctc.co.in या रेल्वेच्या संकेतस्थळावरुन आरक्षण करता येईल. या विशेष गाड्यांमध्ये दुसऱ्या वर्गाचे डबे हे अनारक्षित असतील आणि त्यासाठी रेल्वेच्या युटीएस ॲप वरुन तिकीट काढता येईल. याबद्दलची सविस्तर माहिती रेल्वेच्या संकेतस्थळावर मिळेल.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार झाले. या मोहिमेत भारतीय लष्कराचे दोन जवानही जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कुलगाम जिल्ह्यातल्या कादर या गावात दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर काल रात्रीपासून या भागात

शोधमोहीम राबवण्यात आली. या दरम्यान ही चकमक सुरू झाली होती, अशी माहिती भारतीय लष्कराच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

जम्मू काश्मीरमधल्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत बैठक होत आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा हे देखील या बैठकीत सहभागी होतील.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांमध्ये तापमान मध्य भारतात तीन ते चार अंश सेल्शिअसने तर देशाच्या पूर्व भागात दोन ते तीन अंश सेल्शिअसने वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

वायव्य भारतात पुढचे पाच ते सहा दिवस थंडीची लाट पसरेल. हिमाचल प्रदेश पूर्व राजस्थान आणि पंजाब मध्ये येत्या दोनतीन दिवसांमध्ये थंड ते अतीथंड हवामान असेल तर पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेश इथल्या काही भागांमध्ये सकाळ संध्याकाळ दाट धुकं आणि राजधानी दिल्लीत पहाटे धुरकं असेल असं विभागानं म्हटलं आहे.

दरम्यान काश्मीरमध्ये कडाक्याची थंडी आहे. काही भागांमध्ये तापमान शून्य अंशाखाली गेलं आहे. श्रीनगरमध्ये काही भागांमध्ये शून्याहून खाली सहा अंश सेल्सिअस पर्यंत घसरलं होतं. काल रात्री श्रीनगरमध्ये वजा चार अंश सेल्सिअस तापमान होतं. कालची रात्र ही श्रीनगरमधली चालू मोसमातलीआतापर्यंतची सर्वात थंड रात्र म्हणून नोंदवली गेली.

**//<><><><><>//**